महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.७१/पदभरती/का-४** **दि.२८-१२-२०२३**

## परिपत्रक क्र.४३

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील विविध ७७२ पदे भरण्याकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याबाबत दिनांक १६/०२/२०२३ रोजी www.dvet.gov.in या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. जाहिरातीच्या अनुषंगाने Group-A मधील पदांकरिता अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT-१) **रविवार दिनांक १६/०४/२०२३** रोजी घेण्यात आली होती. सामायिक परीक्षेत (CBT-१) किमान ४५% (५४ गुण) प्राप्त करुन व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांकडून दि.१०/०८/२०३ ते २१/०८/२०२३ या कालावधीत व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता अर्ज स्विकारण्यात आले होते.

विहित शुल्कासह अर्ज केलेल्या उमेदवारांची **व्यावसायिक चाचणी (CBT-२) दि.२१/०१/२०२४** रोजी आयोजित करण्यात आली आहे. व्यावसायिक चाचणीकरिता प्रवेशपत्र (Admit Card) प्राप्त करुन घेण्याकरिता उमेदवारांना परीक्षेच्या किमान ७ दिवस आधी ई-मेलद्वारे Link उपलब्ध करुन देण्यात येईल. उमेदवारांनी सदर Link द्वारे त्यांचे व्यावसायिक चाचणीचे प्रवेशपत्र Download करुन घेणे आवश्यक राहील.

तरी उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-<br>
( दि. अं. दळवी )<br>
संचालक,<br>
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.